# आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दुरध्वनी – ०२२ – २२६४००६३/६५<br>०२२ – २२७१ ७५००<br>फॅक्स – ०२२ – २२६४२९५५<br>E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | 'आरोग्य भवन', ३रा मजला,<br>सेंट जॉर्ज रूग्णालय आवार,<br>पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,<br>फोर्ट, मुंबई ४०० ००१. ४५६७३ |


क्र. राआअ/MAA/ /१६

दिनांक :- १७ सप्टेंबर २०१६

प्रति,

मा. सचिव,
THE FEDERATION OF OBSTETRIC & GYNECOLOGICAL SOCIETIES OF INDIA (**FOGSI**),
**Mumbai.**

**विषय :- Nationwide Breastfeeding promotion & support campaign – "MAA – Mother's absolute Affection".** कार्यक्रमाच्या प्रभावी प्रसिध्दीबाबत......

**संदर्भ** :- MAA सुकाणू समितीच्या १२ ऑगस्ट २०१६ रोजी झालेल्या सभेमधील निर्णय.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये नवजात शिशुंच्या आरोग्यासाठी स्तनपान ही अत्यंत महत्वाची गरज आहे. राज्यातील अर्भक मृत्यू व बालमृत्यू कमी करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. १ तासाच्या आत बालकांना स्तनपान दिल्यास २० % नवजात शिशुंचे मृत्यू टाळता येऊ शकतात. ज्या बालकांना पहिल्या ६ महिन्यांपर्यंत निव्वळ स्तनपान दिले जाते त्या बालकांमध्ये अतिसारामुळे होणाऱ्या मृत्युची शक्यता ११ पटीने तर न्युमोनियामुळे होणाऱ्या मृत्युची शक्यता १५ पटीने कमी असते. परंतू एनएफएचएस-४ च्या सर्व्हेनुसार महाराष्ट्रात ९० % प्रसुती संस्थांमध्ये होऊन सुध्दा जन्मानंतर १ तासाच्या आत स्तनपानाचे प्रमाण ५७.५ % आहे. तसेच ६ महिने निव्वळ स्तनपानचे प्रमाण ५६.६ % आहे आणि ६ ते ८ महिन्या दरम्यान बाळाला पूरक आहार देण्याचे प्रमाण हे ४३.३ % आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता नवजात व अर्भकमृत्यू कमी करण्याकरिता स्तनपानाला प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे. बाळातपणानंतर नवजात अर्भकाला त्वरीत स्तनपान सुरु करण्याची प्रथम संधी ही आपणास उपलब्ध होते. या संधीचा योग्य तो उपयोग करुन लवकरात लवकर १ तासाच्या आत स्तनपान, ६ महिन्यापर्यंत निव्वळ स्तनपान व २ वर्षापर्यंत बाळाला स्तनपान सुरु ठेवणे, या बाबींचा आपल्या स्तरावरुनही पाठपुरावा होणे अपेक्षित आहे.

MAA हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राष्ट्रीयस्तरावर हा कार्यक्रम ५ ऑगस्ट २०१६ रोजी सुरु करण्यात आला असून राज्यात सप्टेंबर २०१६ पासून सदर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात येत आहे. ज्याद्वारे स्तनपानाचे महत्व विषद करणाऱ्या विविध कृतीवर वर्षभर भर देण्यात येणार आहे.

सदर मोहिम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने संदर्भिय सुकाणू समितीमध्ये सर्व विभागांकडून योग्य कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने आपल्या विभागाकडून सदर कार्यक्रमांची जास्तीत जास्त प्रसिध्दी व जनजागृती होण्याच्या दृष्टीने आपल्या असोसिएशनमार्फत खालील कृती अपेक्षित आहेत.

- आपल्याशी संलग्न असणा-या सर्व स्त्रीरोग तज्ञांना सदर विषयाबाबत माहीती देण्यात यावी
- खाजगी वैदयकीय व्यवसायिकांनी त्याच्याकडे येणा-या लाभार्थीचे समुपदेशन करावे.
- खाजगी वैदयकीय व्यवसायीकांनी त्यांच्या रुग्णालयामध्ये MAA कार्यक्रमाबाबत प्रसिदधी साहित्य प्रदर्शित करावे.
- त्याचे रुग्णालय हे BFHI( Baby Friendly Hospital Initiative) मानांकीत असावे.
- खाजगी वैदयकीय व्यावासायीकांना जनजागृती करण्याच्या ब-याच संधी प्राप्त होतात. उदा. लेक्चर्स देणे, वर्तामानपत्रात लेख लिहिणे, पेपर प्रेझेंट करणे इ. यादवारे सदर विषयाबाबत जागृती करणे.

बालकांच्या उज्ज्वल व निरोगी भविष्यासाठी स्तनपान सर्वात आवश्यक असते. याकरीता स्तनपानाबाबत सर्व स्तरावरुन जागृती निर्माण करण्याकरीता आपणाकडून संपूर्णपणे सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा आहे.

17-9-2016

आयुक्त (कु.क) तथा अभियान संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई